स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक **08–01–2010** रोजी दुपारी **03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. भिसीकर प्रविण विलास | **अध्यक्ष** |
| 2. | श्री. नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर | सदस्य |
| 3. | श्री. मुळे अशोक प्रभाकर | सदस्य |
| 4. | श्री. बाबरा रजींदरसिंग अजायबसिंग | सदस्य |
| 5. | श्रीमती. तारा ओमप्रकाश उर्फ लक्ष्मी मुन्ना यादव | सदस्या |
| 6. | श्री. धुरडे दिपक मोरेश्वर | सदस्य |
| 7. | श्री. असलम खा. | सदस्य |
| 8. | श्री. सिराज अहमद | सदस्य |
| 9. | श्री. डडमवार श्याम भास्करराव | सदस्य |
| 10. | श्री. काटले अशोक राजाराम | सदस्य |
| 11. | श्री. वालदे विनोद परसराम | सदस्य |
| 12. | श्री. धोटे मोरेश्वर उर्फ मामा गुलाबरावजी | सदस्य |

रिक्त स्थान – 4

## उपस्थित अधिकारी

1) श्री. अजय रामटेके, अति.उप.निगम. आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमाक 197–** नागपूर म.न.पा. च्या शाळेतील वर्ग 3 ते 7 पर्यंतच्या विद्यार्थ्याकरिता स्कुल बॅग सॅम्पल बी 1 एकूण 28457 विद्यार्थ्याकरिता एकूण स्कूल बॅग 28457 रु.120/– प्रति बॅग ( म.न.पा. सिम्बालसह ) प्रमाणे 50 टक्के मे. सौफी बॅग्ज ॲन्ड नॉव्हेलटीज प्रा. लि. नागपूर व 50 टक्के मे. दिलीप एन्टरप्रायजेस नागपूर यांचेकडून खरेदी करण्यास व या अनुषंगाने येणाऱ्या रु. 34,14,840 /– ( अक्षरी चौतिस लाख चौदा हजार आठशे चाळीस फक्त ) च्या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमाक 198:–** नागपूर शहरातील मलवाहिन्याच्या टाक्यातील रेता/गाळ/ कचरा यांत्रीकी पध्दतीने काढण्यासाठी सात वर्षाकरिता भाडे तत्वावर दोन संच (Slurry / Sludge Handling Vaccum pump on rental basis with heavy duty trash pump, high pressure protable diesel pump & Accessories) घेण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. 38 दि. 21.07.2009 अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता त्यामध्ये मे. बाबोलाट असोसिएट्स यांची एकच निविदा प्राप्त झाली असून प्रती संच प्रती महिना रु. 3,54,000/– दर प्राप्त झाले आहेत. प्रथमता एकच संच घेऊन त्यांची कार्यप्रणाली चांगली आढळल्यास सहा महिन्यानंतर दुसरा संच घेण्यात येईल. दोन संच भाडेतत्वावर घेण्यासाठी पहिल्या वर्षाला रु. 84,96,000/– व त्यानंतर प्रत्येक वर्षी 10% वाढ देऊन सात वर्षा करिता भाडेतत्वावर घेण्यासाठी होणारा खर्च पद क्र. 334 मधुन तरतुद उपलब्ध झाल्यानंतर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 199 :–** वार्ड क्र. 28, गंगाबाग येथील पुलाचे कामास्तव ठराव क्र. 645 दिनांक 17.02.2009 अन्वये मे. पूजा कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 9 टक्के अधिक दराची रु. 27,05,614/– राशीची निविदा मंजूर असून सन 2008–09 मध्ये रु. 15 लक्ष राशी पर्यंतचे कार्यादेश देण्यात आले आहे. उर्वरित कामाचे रु. 12,05,614/– राशीचे मे. पूजा कन्स्ट्रक्शन, यांना उपरोलीखीत ठरावानुसार मंजूर दराने कार्यादेश पद क्र. 474 अंतर्गत निर्गमित करण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 200 :–** नागपूर शहरात प्रस्तावित सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करण्याच्या कामा करिता प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार (पी.एम.सी. ) नेमण्यास्तव प्रस्तावित तीन पॅकेज पैकी पूर्व आणि मध्य नागपूर मतदार संघासाठी पॅकेज–1 करिता निविदा मागविण्यात आली असून प्राप्त दोन निविदापैंकी निविदाकार मे. एस.एन. भोबे ॲन्ड असोसिएट्स प्रा.लि. यांची, वाटाघाटी नंतर प्राकलनीय रक्कम रु. 81.00 कोटी च्या 2.5 टक्के दरांची व रु. 2.025 कोटी रक्कमेची फेर वाटाघाटी नंतरची निम्नतम् दरांची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 201** :– नागपूर शहरात प्रस्तावित सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करण्याच्या कामा करिता प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार (पी.एम.सी. ) नेमण्यास्तव प्रस्तावित तीन पॅकेज पैकी पश्चिम आणि दक्षिण नागपूर मतदार संघासाठी पॅकेज–II करिता निविदा मागविण्यात आली असून प्राप्त तीन निविदापैंकी निविदाकार मे. पी.टी. मसे अन्ड असोसिएट्स प्रा.लि. यांची, प्राकलनीय रक्कम रु. 81.00 कोटी च्या 2.5 टक्के दरांची व रु. 2.025 कोटी रक्कमेची फेर वाटाघाटी नंतरची निम्नतम् दरांची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 202** :– नागपूर शहरात प्रस्तावित सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करण्याच्या कामा करिता प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार (पी.एम.सी. ) नेमण्यास्तव प्रस्तावित तीन पॅकेज पैकी उत्तर आणि पश्चिम नागपूर मतदार संघासाठी पॅकेज–III करिता निविदा मागविण्यात आली असून प्राप्त तीन निविदापैंकी निविदाकार मे. कंसल्टींग इंजिनियरींग सर्व्हिसेस, मुंबई यांची, प्राकलनीय रक्कम रु. 81.00 कोटी च्या 2.5 टक्के दरांची व रु. 2.025 कोटी रक्कमेची फेर वाटाघाटी नंतरची निम्नतम् दरांची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 203** :– वॉर्ड क्र. 108 येथील नवजीवन कॉलनी ते प्रियंकावाडी, प्रगती सभागृह ते प्रियंकावाडी पर्यंत नाल्याचे मजबुतीकरण करण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 41,49,895/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 204** :– वॉर्ड क्र. 97, येथील भांडेवारी सिवरेज प्लॉन्ट ते चांदमारी मंदिर परिसर येथे रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव रु. 70,05,476/– राशीची कामास पद क्र. 482 अंतर्गत वित्तीय तरतूद उपलब्ध करणे व निविदा बोलाविण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 205** :– वॉर्ड क्र. 83, मंगलम ते अग्रवाल बिछायत केंद्रापर्यंत रस्त्याचे डांबरीकरणाचे रु. 15,21,570/– राशीची कामास पद क्र. 482 अंतर्गत वित्तीय तरतूद उपलब्ध करणे व निविदा बोलाविण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 206</u>** :— वार्ड क्र. 68 मारवाडी चाळ, बजेरिया येथील ऑक्ट्राय भवनची दुरुस्ती व तळघराची वॉटर प्रुफिंगचे काम करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यांत आल्या असता मे. नितिन एस. केशरवानी यांची प्राकलनीय दराची एकमेव निविदा राशीची रु. 17,51,526/— ची निम्नत्तम निविदा प्राप्त आहे. दर वाटाघाटी नंतर मे. नितिन एस. केशरवानी यांनी हेच काम प्राकलनिय दरापेक्षा 0.01 टक्के कमी दरात म्हणजेच रु. 17,51,351/— करण्याची सहमती दर्शविली आहे या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 207</u>** :— वार्ड क्र. 115 येथे व्यायामशाळेचे बांधकाम करण्याकरीता निविदा मागविण्यात आल्या असता मे. क्रियेटिव्ह कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 8 टक्के अधिक दराची निविदा प्राप्त आहे. कंत्राटदारास दर कमी करण्यास विचारणा केली असता कंत्राटदार हे काम प्राकलनिय दरापेक्षा 5 टक्के अधिक दराने करण्यास तयार असल्यामुळे रु. 3701172/— च्या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून आर्थिक वर्ष 2009—2010 मध्ये कार्यादेश राशी रुपये 10.00 लक्ष पर्यंत मर्यादित ठेवण्याचा अटीवर समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 208</u>** :— वार्ड क्र. 108 येथे छत्रपती नगर, प्रगती कॉलोनी येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे. रु. 919270/— च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 209</u>** :— वार्ड क्र. 37 मधे वैशाली नगर चौक येथे 125 मी उंचीचा हायमास्ट लावुन प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु. 3,60,000/— च्या कामास प्राधान्य देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 210</u>** :— नागपूर शहरातील रस्त्यावरील दिव्यांच्या देखभालीकरीता साहित्य खरेदी करणे व दुरुस्ती करणे या करीता

अ) लॅपस, चोक्स/बॅलॅस्टस, इग्नेटर्स इत्यादी साहित्य खरेदी करणे.

ब) टाईमर्स, कॉन्टॅक्टर्स इत्यादी स्विच गियर्स चारेदी  करणे

क) रस्त्यावरील दिव्यांची दुरुस्ती करणे व (अ) तसेच (ब) वर नमूद साहित्य वगळता इतर साहित्याचा पुरवठा करणे–बसविणे–

वर नमूद कामाच्या रु. 1,07,36,910/– रकमेच्या चार महिन्यांच्या काळातील संभाव्य खर्चाच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा व 'अ' 'ब' व 'क' करीता अनुक्रमे नामांकीत उत्पादकांकडून स्विच गियर्सचे नामांकीत उत्पादनांच्या निर्मात्यांकडून/निर्मात्यांचे अधिकृत विक्रेते यांचेकडून व नामपामध्ये योग्य श्रेणीत नोंदणी झालेल्या अनुभवी अनुज्ञप्ती धारक कंत्राटकारांकडून  झोननिहाय निविदा बोलवून हे काम करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 211</u> :–रेल्वे स्टेशन उड्डान पुलाखालील व्यापारी संकुलातील दुकानांच्या मिटर पर्यत विज  पुरवठयाची व्यवस्था करण्याकरीता रु. 93,69,669/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 212</u> :–वार्ड क्र. 38 मधील किदवाई ग्राऊड नवानकाशा येथे प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु. 13,30,460/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.